# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र १३१** **दिनांक- २१/०५/२०२१**

**नवघर पोलीसांनी खोटे नाव सांगून फसवणूक करणाऱ्या इसमास अटक करून त्याचेकडुन ०६,५९,४००/- रु. किंमतीचा गेला मुद्देमाल केला हस्तगत.**

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३८२/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ४२०,४०६ प्रमाणे दि. २०.०५.२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी हरेश जगजिवन विठलानी, वय ५७ वर्षे, यांचेकडुन आरोपी दिनेश बी. शहा असे खोटे नाव सांगुन तसेच मला २० टन साखर दान करायची असल्याने सांगुन ०६,५९,४००/- रु. किं. ला विकत घेवुन त्याचे पैसे फिर्यादी यांना न देता स्वतःचा संपर्क क्रमांक बंद करुन फसवणुक केली होती.

सदर गुन्हा हा लवकरात लवकर उघडकीस आणण्यासाठी नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपासाच्या आधारे तपास करुन नमुदचा गुन्हा हा आरोपी नामे दिनेश बी. शहा ऊर्फ तुषार बाबुभाई लुहार, रा. मिरारोड पुर्व, व मोहमद सईद रिफाकत हुसेन सय्यद, रा. मिरारोड यांनी आपसात संगणमत करुन केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

त्यानुसार आरोपी नामे मोहमद सईद सय्यद यास नयानगर, मिरारोड पुर्व येथुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे तपास करुन त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. त्यानंतर त्याने गुन्हयातील फसवणुक केलेला ०६,५९,४००/- रु. किं. ची साखर त्यात ५० किलो ग्रॅम वजनाच्या एकुण ४०० गोण्या असा मुद्देमाल अनमोल ट्रेडींग कंपनी, नयानगर,मिरारोड पुर्व येथे ठेवला असल्याचे सांगितल्याने सदरचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे दिनेश बी. शहा ऊर्फ तुषार बाबुभाई लुहार, रा. मिरारोड पुर्व यास गुन्हयाचा पुढील तपास करुन अटक करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे. नमुद गुन्हा दाखल होताच गुन्हयाचा तत्काळ तांत्रिक तपास करुन तात्काळ नमूद गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयातील फसवणुक व अपहार झालेला संपुर्ण माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी श्री अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ.शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहोळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोशि/२८३८ युनुस गिरगांवकर, पोशि/३४५८ संदिप जाधव यांनी केला आहे.

Scanned with CamScanner